**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता)**

क्र. पोमसं/८अ/नि.सू.-२०१६-१७(का.अ.-प्र.अ.)जिल्हा/२०४/२०१६ मुंबई, दि. 27/०६/२०१७.

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षक (राजपत्रित गट-ब) यांना प्रशासकीय अधिकारी (राजपत्रित गट-ब) पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | कार्यालय अधीक्षकाचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री प्रकाश नामदेव जाधव | पोलीस आयुक्त, नवी मुंबई | पोलीस आयुक्त, नवी मुंबई | दि. ३०/६/२०१७ रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदात. |
| २. | श्री देवसिंग बाबुसिंग राठोड | पोलीस अधीक्षक, वाशिम | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | रिक्त पदात |

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, नवी मुंबई / अमरावती शहर
पोलीस अधीक्षक, वाशिम

२. उपरोक्त कार्यालय अधीक्षक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या वित्तीय वर्षात सन २०१६-१७ मध्ये संपुष्टात येत नसेल तर त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त न करता सविस्तर अहवाल या कार्यालयात पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

३. उपरोक्त कार्यालय अधीक्षकांविरूध्द वरिलप्रमाणे काहीच प्रलंबित नसेल तर, श्री देवसिंग बाबुसिंग राठोड यांना, ने. पोलीस अधीक्षक, वाशिम यांना दि. ३०/६/२०१७ पुर्वी पर्यायी कार्यालय अधीक्षकाची वाट न पाहता कार्यमुक्त करावे. तसेच श्री प्रकाश नामदेव जाधव, ने. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी दि. १/७/२०१७ रोजी न चुकता प्रशासकीय अधिकारी पदाचा पदभार स्वीकारावा व पदभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास सत्वर कळवावा.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय/१०८२/सीआर/११००(२)/अेसईआर-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त कार्यालय अधीक्षकांनी कृपया नोंद घ्यावी.

५. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

६. वर नमूद कार्यालय अधीक्षकांपैकी ज्यांना पदोन्नती नाकारावयाची असेल, त्यांनी त्यांचे अर्ज दि. २/७/२०१७ पुर्वी घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावेत.

प्रत:-

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० व १२
पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष

२. सदरचे आदेश पोलीस महासंचालक यांचे संकेतस्थळावर सर्वांसाठी एक महिन्याकरिता उपलब्ध करुन द्यावेत.

**(अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.